PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chintu
Year: 2012

Song: Ghar Ke Andar Chhota
Lyricist: Sandeep Khare

घर के अंदर छोटा बंदर
घर के अंदर छोटा बंदर
भोळा हळवा कधी बिलंदर
घर के अंदर छोटा बंदर
चिंटू...
चिंटू...
चिंटू
कधी हसणार कधी रूसणार
हसवत हसवत कधी फसणारा
प्रत्येकाच्या घराघरातून
मनामनातून तू...
चिंटू...
चिंटू...
चिंटू
छोटया छोटया डोक्यामध्ये
प्रश्न हजार
असे करा अन् तसे नको ने
जीव बेजार
छोटया छोटया डोक्यामध्ये
प्रश्न हजार
असे करा अन् तसे नको ने
जीव बेजार
शाळेमध्ये गृहपाठाची
कटकट रे
अरे पोळी संपव भाजी संपव
कटकट रे
पाऊस आला भिजू नको
चिखलामध्ये खेळू नको
पाऊस आला अरे भिजू नको रे
चिखलामध्ये खेळू नको ना
थोडे भांडण थोडा दंगा रे
उगाच केव्हा पंगा रे
चाल सरळ कधी तिरकी रे
उगाच घ्यावी फिरकी रे
चिंटू...
चिंटू...

आई म्हणते हात टेकले
बाबा म्हणती शब्द संपले
आई म्हणते हात टेकले
बाबा म्हणती शब्द संपले
कधी आजी कधी आजोबा
कुशीत घुसतो लाडोबा
कधी वाटते खुळे पाखरू
कधी पक्का हा वाघोबा
चिंटू...
चिंटू...
चिंटू
काकूंच्या बागेवर डल्ला
लय भारी
मित्रांसोबत हल्लागुल्ला
लय भारी
काकूंच्या बागेवर डल्ला
लय भारी
मित्रांसोबत हल्लागुल्ला
लय भारी
एक कोवळी किलबिल किलबिल
प्रश्न भाबडे उत्तर मिश्किल

PlanetRead

Literacy for a Billion

एक कोवळी किलबिल किलबिल
प्रश्न भाबडे उत्तर मिश्किल
चिंटू...
चिंटू...
चिंटू...
चिंटू...
आठवते का
आठवते का
चिखलामध्ये हात कधी बरबरटले
तहान विसरून भटके पाय
भोवऱ्याभोवती भिरभिरले
काच लावून मांजा चूरळत
डबक्यामध्ये खुशाल लोळत
पैज लावून गोट्या जिंकलात
मित्राकडचा स्टॅम्प ढापलात
आईसक्रिमवरी केला हल्ला
हरळी पेरून बांधला किल्ला
झुडूप उपटून फुलपाखराच्या मागे
पाय घालतो पिंगा
थंडीत अजून दूरवरून
आगगाडीचा ऐकता भोंगा
दंगा मस्तीची लयलुट
अर्ध्या चड्डीमधले भूत
दंगा मस्तीची लयलुट
अर्ध्या चड्डीमधले भूत
चिंटू...
चिंटू...
रडणे चिडणे पडणे
चिंटू
घरादाराचे हसणे
चिंटू
बालपणाचा रेशीम दोर
प्रत्येकातील छोटं पोर
चिंटू...
चिंटू...
चिंटू...
चिंटू...
चिंटू...
चिंटू...
चिंटू...
चिंटू...
चिंटू
चिंटू
प्रत्येकाच्या घराघरातून
मनामनातून तू...
हे... चिंटू

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*